# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

**परीक्षा प्राध्यान्य/महत्वाचे**

क्र.कोविमं/शाखा १२वी/गोपनीय/ 1557
कोल्हापूर - ४१६ ००४.
दिनांक : २८/१०/२०२१

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविदयालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय - फेब्रु/मार्च २०२२ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी शिक्षक माहिती पाठविणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी मंडळाकडून ज्या विषयांकरिता अंतर्गत व बहिस्थ परीक्षक म्हणून नियुक्ती केली जाते. अशा विषयांच्या शिक्षकांची माहिती मंडळाकडे उपलब्ध आहे. ती माहिती विषयनिहाय पडताळणीसाठी या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. त्याची खालील मुद्देनिहाय पडताळणी व सुधारणाकरुन अद्यावत माहिती परत मंडळाकडे पाठविण्यात यावी.

१. यादीमधील विषयनिहाय शिक्षक हे त्याच विषयाला शिकवत आहेत काय ? कनिष्ठ महाविदयालयात प्रात्यक्षिक परीक्षा असलेल्या विषयांना शिकवत असलेल्या सर्व शिक्षकांची नावे आहेत काय ? नसल्यास शिकवत असलेल्या विषयनिहाय सर्व शिक्षकांची त्या विषयामध्ये नावे समाविष्ट करण्यात यावी म्हणजे त्या शिक्षकांच्या प्रमाणात प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आपल्या कनिष्ठ महाविदयालयास बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती केली जाईल. बहिस्थ व अंतर्गत परीक्षक कमी पडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविदयालयाची राहील.
२. सर्व विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी शिक्षकांचे नाव येणे आवश्यक आहे. शिक्षक माहिती नसल्यास शिक्षकांचे नाव समाविष्ट करावे कोणत्याही परिस्थितीत रकाना रिकामा सोडण्यात येवू नये. म्हणजे सदर विषयास अंतर्गत/बहिस्थ परीक्षक नियुक्ती करणे मंडळास सुलभ होईल.
३. शिक्षक माहिती पडताळणी करत असताना संबंधीत विषय शिक्षकांना दाखवून त्यांची स्वाक्षरी घ्यावी. तसेच आवश्यकतेनुसार संबंधीत विषय शिक्षकांना मंडळाचे परीक्षक/नियामक म्हणून काम करावे लागेल व परीक्षक /नियामक पॅनलमध्ये त्यांचे नाव समाविष्ट करण्यात येईल. (एमसीव्हीसी विषय सोडून) याचीही कल्पना देण्यात यावी. त्यामूळे मंडळामार्फत परीक्षक/नियामक म्हणून नियुक्त केल्यास ती स्विकारणे बंधनकारक राहील.
४. एमसीव्हीसी विषयाची शिक्षक माहिती पडताळणी करत असताना या विषयासाठी निदेशकांचेच नाव असल्याची खात्री करावी. निदेशकाव्यतिरिक्त विषय शिकविणा-या शिक्षकांचे नाव आल्यास निदेशकाचे नाव देवून दुरुस्ती करावी जेणेकरुन भविष्यात कोणाची तक्रार येणार नाही.

वरीलप्रमाणे माहितीची पडताळणी करुन जास्तीत जास्त शिक्षकांची माहिती **दि. २०/११/२०२१ पर्यंत** मंडळाकडे पाठविण्यात यावी. म्हणजे मंडळास अंतर्गत/बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती करणे सुलभ होईल. अंतर्गत/बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती अभावी परीक्षा घेण्यास अडचणी निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविदयालयाची राहील याची नोंद घ्यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - आपल्या कनिष्ठ महाविदयालयातील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्राप्त शिक्षकांची संगणक यादी.